जा.क्र.पोअ/आस्था-१/सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द/ 409 /२०२२
पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
नवीन प्रशासकीय इमारत, संकुल, मोरे कुरण रोड, जिल्हा पालघर.
दुरध्वनी- ०२५२५- २५११००(कार्यालय)
E-mail : sp.palghar@mahapolice.gov.in
दिनांक :-०५.०८.२०२२

**संदेश घेणार** :- सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी/प्रभारी पोलीस स्टेशन/ शाखा प्रभारी अधिकारी

**प्रत हस्ते** :- रापोनि, पोलीस मुख्यालय पालघर

**संदेश** :- पोलीस अधिक्षक, पालघर

---

संदेश :-

सर्व प्रभारी उप विभागीय पोलीस अधिकारी व प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे, शाखा तसेच पोलीस मुख्यालय यांना कळविण्यांत येते की, आपले पोलीस ठाणे, शाखेत, मुख्यालयात नेमणुकीत असलेल्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक, पोलीस शिपाई संवर्गातील पोलीस अंमलदार यांचे सेवाजेष्ठतेनुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक/पोलीस हवालदार पदी पदोन्नती देणेकामी सेवाजेष्ठता यादी पालघर जिल्हा पोलीस दलाचे www. Palghar police. Gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आली आहे. (.) सदर सेवाजेष्ठता यादी सर्व पोलीस अंमलदार यांचे निदर्शनास आणुन द्यावी व सदरचे पत्र दररोज सर्व अंमलदारांना ५ दिवस हजेरीवर वाचुन दाखवावे. (.) तसेच जे पोलीस अंमलदार दिर्घ रजेवर/गैरहजर आहेत त्यांना प्रसिध्द करण्यांत आलेल्या यादीचे अवलोकन करणेबाबत समज पत्र देवुन त्यांची नोंद आपले आस्थापनेवर ठेवावी तसेच एक प्रत या कार्यालयास सादर करावी (.) सदर सेवाजेष्ठता यादीत त्यांचे जात/प्रवर्ग/जन्म तारीख/भरती तारीख/पदोन्नती तारखेत काही तफावत असल्यास त्यांबाबतचे आक्षेप इकडील कार्यालयास सादर करणेबाबत समज देण्यांत यावी (.) तसेच ज्या पोलीस अंमलदारांचे नांव सेवाजेष्ठता यादीत समाविष्ठ नाही (.) तसेच सेवाजेष्ठता यादीत प्रसिध्द केलेल्या अंमलदारांपैकी एखादा अंमलदार सेवेतुन कमी/बडतर्फ/सक्तीने सेवानिवृत्ती/मयत/आंतर जिल्हा बदली झाले असल्यास अशा अंमलदारांची नांवे तात्काळ इकडील कार्यालयास सादर करणेबाबत समज देण्यांत यावी (.) तरी प्रसिध्द करण्यांत आलेल्या सेवाजेष्ठता यादीत काही तफावत असल्यास त्यांबाबतचे आक्षेप दि. ०८/०८/२०२२ रोजी पर्यंत आस्थापना शाखेत लेखी स्वरुपात सादर करणेबाबत (.) सर्व प्रभारी अधिकारी यांनी आपले नेमणुकीत असलेल्या पोलीस अंमलदारांना समज देण्यांत यावी (.)

सदर सेवाजेष्ठता यादी तात्पुरत्या स्वरुपाची असुन, संबंधीत पोलीस अंमलदार यांच्याकडुन प्राप्त झालेल्या आक्षेपानुसार सदर यादीत आवश्यक दुरुस्ती करुन, त्याबाबत सुधारी सेवाजेष्ठता यादी www. Palghar police. Gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल (.)

(शैलेश काळे )
पोलीस उप अधीक्षक (गृह)
पोलीस अधीक्षक पालघर करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल पालघर

२/- सदर सेवाजेष्ठता यादया सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी/प्रभारी पोलीस स्टेशन/ शाखा प्रभारी अधिकारी /रापोनि, पोलीस मुख्यालय, पालघर तसेच सर्व पोलीस अंमलदारांचे ई-मेल आयडीवर प्रसिध्द करण्यांत यावी.